वन्यप्राण्यांपासून शेतपिकांचे, फळझाडांचे नुकसान
झाल्यास संबंधितास नुकसान भरपाई देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : डब्ल्युएलपी-२०१२/प्र.क्र.३२६/फ-१,**
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : ०९ जुलै, २०१५.

**पहा :**

१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक-डब्ल्यूएलपी-१०.०८/प्र.क्र.२७०/फ-१, दिनांक २.७.२०१०.
२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक-डब्ल्यूएलपी-२०१२/प्र.क्र.३२६/फ-१, दिनांक ५.९.२०१३.
३. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक-डब्ल्यूएलपी-०४१३/प्र.क्र.१२३/फ-१, दिनांक २५.११.२०१३.
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-२३(४/ प्र.क्र.२३ /२(२०१३-१४)/२३६, दिनांक २८.४.२०१४.

**प्रस्तावना :-**

राज्यातील रानडुक्कर, हरिण (सारंग व कुरंग), रानगवा, रोही (निलगाय), माकड, वानर तसेच वन्यहत्ती या वन्यप्राण्यांपासून शेतपिकाला किंवा फळबागांना नुकसान झाल्यास दिनांक २.७.२०१०, दिनांक ५.९.२०१३ व दिनांक २५.११.२०१३ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतुदींनुसार नुकसान भरपाईची रक्कम संबंधितांना अदा करण्यात येते. सदर नुकसान भरपाईची रक्कम अपुरी असल्यामुळे वन्यप्राण्यांच्या अस्तित्वाबद्दल जनसामान्यात निर्माण होणारे प्रतिकूल मत विचारात घेता सदर रकमेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

राज्यातील रानडुक्कर, हरिण (सारंग व कुरंग), रानगवा, रोही (निलगाय), माकड, वानर तसेच वन्यहत्ती या वन्यप्राण्यांपासून शेतपिकाला किंवा फळबागांना नुकसान झाल्यास खालीलप्रमाणे नुकसान भरपाई देण्यात यावी.

**पीक नुकसानीपोटी द्यावयाचे आर्थिक सहाय्य**

| अ.क्र. | तपशील | आर्थिक सहाय्य |
|---|---|---|
| १ | शेतपिकाचे नुकसान रु.१००००/- पर्यंत झाल्यास | पूर्ण किंमत परंतु किमान रु.१०००/- |

| | | |
|---|---|---|
| २ | शेतपिकाचे नुकसान रु.१००००/- पेक्षा जास्त | रु.१००००/- अधिक रु.१००००/- चे वरील नुकसानीचे ८०% रक्कम (रु.२५०००/- चे कमाल मर्यादेत) |
| ३ | ऊस पिकाचे नुकसान | रु.८००/- प्रती मे.टन प्रमाणे (रु.२५०००/- चे मर्यादेत) |

**फळबांगाच्या केलेल्या नुकसानीपोटी द्यावयाचे आर्थिक सहाय्य**

| अ.क्र. | प्रजाती | आर्थिक सहाय्य |
|---|---|---|
| १ | नारळ | रु.४८००/- प्रती झाड |
| २ | सुपारी | रु.२८००/- प्रती झाड |
| ३ | कलमी आंबा | रु.३६००/- प्रती झाड |
| ४ | केळी | रु.१२०/- प्रती झाड |
| ५ | इतर फळझाडे | रु.५००/- प्रती झाड |

२. इतर अटी व तरतूदी दि. २.७.२०१०, दिनांक ५.९.२०१३ व दिनांक २५.११.२०१३ च्या शासन निर्णयाप्रमाणे लागू राहतील.

३. सदर शासन निर्णय, निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक : १९७/व्यय-१०, दिनांक ०५.०६.२०१५ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०७०९१६१०३७५४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

APTE ARVIND SHANKAR

Digitally signed by APTE ARVIND SHANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT,CID - 918010, postalCode=400032, st=Maharashtra, cn=APTE ARVIND SHANKAR
Date: 2015.07.09 16:13:15 +05'30'

(अरविंद आपटे)
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग

**प्रत माहिती आणि उचित कार्यवाहीसाठी :-**

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) महासंचालक, माहिती व प्रसिध्दी, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान मुख्य वनसंरक्षकक, (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१०) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
११) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ, नागपूर.
१२) संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर/मुंबई (बोरीवली)/नाशिक.
१४) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), सर्व.
१५) मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे/कोल्हापूर/नाशिक.
१६) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.
१७) मुख्य वनसंरक्षक तथा संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली.
१८) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर.
१९) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.
२०) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सहयाद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर.
२१) वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प, गोंदिया/ ठाणे.
२२) सर्व पोलिस आयुक्त.
२३) सर्व जिल्हाधिकारी.
२४) उपवनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व.
२५) उपवनसंरक्षक (वन्यजीव), अकोला/औरंगाबाद.
२६) विभागीय वन अधिकारी, सांगली/उस्मानाबाद/बीड / हिंगोली /चिपळूण.
२७) उप विभागीय संगमनेर/मालेगाव/ भोर.
२८) सर्व पोलिस अधीक्षक.
२९) सर्व जिल्हा कृषी अधिकारी.
३०) महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षण /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य , मुंबई / नागपूर.
३१) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
३२) वित्त विभाग (व्यय-१० कार्यासन), मंत्रालय, मुंबई - ३२.
३३) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
३४) वन कक्षातील सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३५) फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती).